आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ३०९ वा ● शुक्रवार दि. १६ मे २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीचा लातूरमध्ये जल्लोष

लातूर : वीर योद्धा संघटनेच्या वतीने लातूर शहरात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. या निमित्ताने शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये हजारो नागरिकांनी सहभाग घेतला.



शोभायात्रेची विशेष आकर्षण ठरली ती लाठी काठी चे प्रात्यक्षिक. या सादरीकरणाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचे दर्शन घडवले.

वीर योद्धा संघटना गेली अनेक वर्षे लातूर शहरात विविध महापुरुषांच्या जयंत्या आणि स्मृतिदिन साजरे करत आहे. यंदा देखील संघटनेने पारंपरिक भगवा ध्वज फडकावत, आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक काढत जयंतीचा उत्सव साजरा केला.

यावेळी जयंती उत्सव समिती २०२५ चे अध्यक्ष श्री. विजयकुमार सुर्यवंशी पाटील, वीर योद्धा संघटना संस्थापक अध्यक्ष श्रीकांत रांजणकर आणि संघटनेचे महाराष्ट्र प्रमुख श्री. निळकंठ किल्लारीकर सर यांचे मार्गदर्शन खाली ही मिरवणूक यशस्वीरीत्या पार पडली. तर संतोष यादव, बालाजी फिस्के, रोहित रांजणकर, पांडुरंग क्षिरसागर, कृष्णा पांढरे, रितेश शितोळे, शिवानंद पवार, ओमकार मुळे, श्रीहरी शितोळे, दयानंद जाधव, नागनाथ मांडुरके, महेश गिरी, सूरज व्यवहारे, विक्की कांबळे, धीरज पाटील, दीपक तांदळे, ओमकार मगर, शंभू उपाडे, अक्षय गरड, वैभव भालेकर, चरण हिरवे, प्रथमेश पवार, अजय निलंगे, प्रशांत शिंदे आणि इतर अनेक समर्पित कार्यकर्ते उपस्थित होते. शोभायात्रेमुळे संपूर्ण लातूर शहरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शिस्तबद्धतेने आणि अभिमानाने हा कार्यक्रम यशस्वी केला. छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्याची आठवण करून देणारा हा कार्यक्रम प्रत्येक लातूरकरांच्या मनात स्फूर्ती आणि राष्ट्राभिमान जागवून गेला.

## दयानंद विज्ञानमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात



दि.१४ मे २०२५ रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांनी धर्मवीर,स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी सेल्फ फायनान्सचे प्रिन्सिपल प्रा.अनिलकुमार माळी,पर्यवेक्षिका डॉ.संध्या वाडीकर,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,प्रा.मेघा पंडित, डॉ.कोमल गोमारे,विनोद घार,सुदाम सातपुते,किशोर जाधव,विष्णू नाईकवाडे,मोहसीन शेख,अशोक मदने,प्रियंका हिप्परकर,पाटील पी.वाय,सागर इंदानी,शंकर भालके,यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




## पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रयत्नातून लातूर जिल्हा रुग्णालयाच्या जागेचा निधी विद्यापीठाला वर्ग

लातूर (जिमाका) : पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असलेल्या लातूरच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या जागेचा विषय मार्गी लागला आहे. या जागेच्या मोबदल्यासाठी आरोग्य विभागाला प्राप्त झालेला ३ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी कृषी विभागाच्या १४ मे २०२५ रोजीच्या पत्रानुसार परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला वर्ग करण्यात आला. त्यामुळे ही जागा आरोग्य विभागाला हस्तांतरित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



सन २०13 मध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्यास मान्यता देण्यात आली होती. १०० खाटांचे हे रुग्णालय उभारण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानातून ३१ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी ही प्राप्त झाला आहे. या रुग्णालयासाठी कृषि महाविद्यालयाची १० एकर जागा निश्रि्चत करण्यात आली आहे. या जागेचा मोबदला म्हणून परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये देण्यास मान्यता देण्यात आली होती. मात्र, निधी अभावी ही कार्यवाही प्रलंबित होती.

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी लातूर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर पहिल्याच दौऱ्यात त्यांनी हा प्रश्र्न मार्गी लावण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून त्यांनी मार्चमध्ये झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जिल्हा रुग्णालयाच्या जागेसाठी आवश्यक निधी पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर करून घेतला होता. हा निधी आरोग्य विभागाकडे प्राप्त झाला होता. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनीही यासाठी आवश्यक कार्यवाहीच्या सूचना दिल्या.

तसेच परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला हा निधी वितरीत करण्याबाबतचा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने निर्गमित केला होता. मात्र, हा निधी कोणत्या खातेक्रमांकावर जमा करावा, याबाबत संभ्रम असल्याने कृषी विद्यापीठाने राज्य शासनाच्या कृषी विभागाकडे मार्गदर्शन मागविले होते. गेल्या काही दिवसांपासून हा विषय प्रलंबित होता.

याविषयी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मंत्रालय स्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर दिनांक १४ मे २०२५ रोजी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाने शासन निर्णय निर्गमित करून आरोग्य विभागाकडील निधी कृषी विद्यापीठाच्या महसूल खाती जमा करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार जिल्हा रुग्णालयासाठी आवश्यक सर्वे क्र. ३७ मधील १० एकर जागेच्या मोबदल्यापोटी ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये निधी परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला वर्ग करण्यात आला आहे.

## परिचारिका ही रुग्ण सेवेची खरी जननी डॉ. अमोल डोईफोडे

लातूर – प्रत्येक रुग्णालयातील रुग्णांना सहानुभूती आणि सेवाभावाने मदत करणारी पहिली व्यक्ती म्हणजे परिचारिका. त्या केवळ शारीरिक उपचारच नाही, तर रुग्णांना मानसिक आधार देखील देतात. त्यामुळे रुग्ण सेवेची खरी जननी ही परिचारिकाच आहे, असे प्रतिपादन प्रभारी उप प्राचार्य डॉ. अमोल डोईफोडे यांनी केले.



जागतिक परिचारिका दिनानिमित्त एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथे परिचारिकांचा कृतज्ञता सत्कार सोहळा घेण्यात आला. या प्रसंगी डॉ. अमोल डोईफोडे बोलत होते. यावेळी मुख्य लेखा अधिकारी सुनील कवठेकर, प्रशासकीय अधिकारी बाबासाहेब सुर्यवंशी, परिचारिका पर्यवेक्षक संतोष मसुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी सर्व परिचारिकांचा सत्कार करून त्यांच्या रुग्ण सेवेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

मानसिक, शारीरिक आणि वैद्यकीय दृष्ट्या एकरूप होऊन रुग्ण सेवा देण्याचे काम परिचारिका सातत्याने करतात. रुग्णसेवेच्या व्यस्ततेत स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होण्याचा धोका असल्याने, परिचारिकांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे सांगून यावेळी पुढे बोलताना डॉ. अमोल डोईफोडे म्हणाले की, परिचारिका केवळ उपचाराची पूर्तता करत नाहीत, तर त्या रुग्णाचे मनोबलही वाढवतात. रुग्णसेवा हीच ईश्र्वरसेवा समजून त्या निस्वार्थपणे कार्य करतात. रुग्णांच्या वेदनांमध्ये आधार देणाऱ्या, औषधोपचारांबरोबरच मानसिक आधार देणाऱ्या आणि संकटसमयी रात्रंदिवस न थकता सेवा देणाऱ्या परिचारिकांच्या कार्याला उतराई होण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो, असे डॉक्टर डोईफोडे यांनी सांगितले.

यावेळी बोलताना श्री सुनील कवठेकर म्हणाले की, परिचारिकांनी त्यांचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य सांभाळून रुग्णसेवा करावी. श्री संतोष मसुरे यांनी भारतीय सैन्यात दिलेल्या रुग्ण सेवेबाबत उपस्थितांना माहिती दिली. मानसशास्त्रज्ञ श्री संदेश नागरगोजे यांनी परिचारिकांना मानसिक आरोग्याबाबत मार्गदर्शन केले.

जन्म आणि मृत्यू अशा दोन्ही वेळी सोबत असणारी व्यक्ती म्हणजे परिचारीका. परिचारीका ही स्वताचे दु:ख विसरुन आईच्या भूमीकेतून रुग्णाच्या वेदना कमी करण्यासाठी काम करते, असे परिचारिका राणी फुंदे यांनी सांगीतले तर रुग्णाच्या वेदनेवर मायेची फुंकर घालण्याचे काम परिचारीका करते असे योजना अमुगे आपल्या मनोगतात म्हणाल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल ज्ञानोबा केंद्रे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## राज्यस्तरीय बाजार समित्यांचे सक्षमीकरण करताना शेतकरी हित व सदस्यांच्या अधिकाराचे रक्षण गरजेचे - उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई: राष्ट्रीय नामांकित बाजार अनुषंगाने राज्यस्तरीय बाजारांचा विकास करताना राज्यातल्या शेतकऱ्यांचे हित जपले गेले पाहिजे. बाजार समिती सदस्यांच्या अधिकारांचे रक्षण झाले पाहिजे. बाजार समिती सदस्य जनप्रतिनिधींमधून निवडून येतात. शेतकऱ्यांचे, समाजातील विविध घटकांचे प्रतिनिधीत्व करतात. या सदस्यांचे अधिकार कायम ठेवण्यातच शेतकरी व समाजाचे हित आहे. यातूनच बाजार समित्या अधिक कार्यक्षम, बळकट होतील. बाजार समित्यांसदर्भातील निर्णय घेत असताना शेतकऱ्यांते हित सर्वोच्च असावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कृषी उत्पन्न बाजार समित्यासंदर्भातील विविध प्रश्र्नांवर आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.



उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात, राष्ट्रीय नामांकित बाजार अनुषंगाने राज्यस्तरीय बाजार विकसित करणे, कृषी उत्पन्न बाजार समिती कर सुधारणा करणे, कृषी उत्पन्न बाजार समित्यांची देखभाल दुरुस्ती, वस्तू व सेवाकराबाबत अडचणी, छोटे उद्योग व व्यापाऱ्यांच्या व्यवसाय कराबाबतच्या समस्या, कळंबोली येथे स्टील मार्केटसाठी सिडकोच्या माध्यमातून जमीन उपलब्ध करुन देणे आदी विषयांवर चर्चा करण्यासाठी बैठक पार पडली. बैठकीला रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, पणनमंत्री जयकुमार रावल, वित्त विभागाचे प्रभारी अपर मुख्य सचिव सौरभ विजय, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, राज्य कर आयुक्त आशिष शर्मा, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल (व्हिसीद्वारे), उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे, पणन संचालक विकास रसाळ, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष जितेंद्र शहा, ‘एमएएसएसएमए’चे अध्यक्ष चंदन भन्साली, नवीमुंबई एपीएमसीचे संचालक सुधीर कोठारी (व्हीसीद्वारे) आदी मान्यवरांसह संबधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातल्या शेतकऱ्यांच्या शेतमालाला सुरक्षित बाजारपेठ उपलब्ध करत शेतकऱ्यांचे हित जपण्याचे, त्यांच्या आर्थिक प्रगतीला हातभार लावण्याचे काम बाजार समित्यांनी सातत्याने केलं आहे. शेतकऱ्यांच्या हितांचे रक्षण राज्यासाठी सर्वोच्च आहे. केंद्र सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण विभागाच्या नवीन २०१७ च्या कायद्यातील तरतूदींनुसार महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) या १९६३ च्या कायद्यात सुधारणा करुन राष्ट्रीय नामांकित बाजार समिती स्थापन करणे, अस्तित्वात असलेल्या बाजार समितीचे रुपांतर राष्ट्रीय नामांकित बाजार समितीमध्ये करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. त्यानुसार राष्ट्रीय बाजार समिती स्थापन झाल्यानंतर शासनाकडून त्यासमितीवर नामनिर्देशित व्यक्तींची नियुक्ती होणार आहे. राष्ट्रीय बाजारांच्या अनुषंगाने राज्यस्तरीय बाजारांचा विकास करण्यासंदर्भातही बैठकीत चर्चा झाली. शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करुनच यासंदर्भातील निर्णय घ्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

व्यापारी वर्गाकडूनही बैठकीत अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले. जीएसटी आकारणीत सुसूत्रता, व्यापाऱ्यांना अकारण होणारा त्रास थांबवण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. करचुकवेगिरी रोखण्यासाठी जीएसटी वसुली पद्धतीत सुधारणांसंदर्भात व्यापारी संघटनांनी केलेल्या मागण्यांवर सकारात्मक विचार केला जाईल. जीएसटी कौन्सिलच्या आगामी बैठकीत व्यापाऱ्यांच्या मागण्या उपस्थित करुन त्यांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल. उद्योग, व्यापार क्षेत्रात अधिक सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री पवार यांनी बैठकीत दिल्या.

## पालघर मध्ये होतोय चार दिवसासाठी बांबू जनजागृती जागर

मुंबई: वातावरण बदलाच्या संकटाला सामोरे जाऊन शाश्र्वत विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी पालघर जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांमध्ये मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्र्वत विकास टास्क फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष ( कॅबिनेट मंत्री दर्जा) पाशा पटेल आणि राज्यस्तरीय आदिवासी विकास समिती अध्यक्ष (मंत्री दर्जा) विवेक भाऊ पंडित, यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण आढावा बैठका आयोजित करण्यात आल्याचे पालघर जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी जाहीर केले आहे.




राज्यातील वातावरणीय बदलाच्या संकटाला तोंड देवून शाश्र्वत विकास साधण्यासाठी राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात बांबू लागवडीस शेतकऱ्यांना उद्युक्त करून जिवाश्म इंधनाला पर्याय म्हणून बांबूचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली 'पर्यावरण व शाश्र्वत विकास टास्क फोर्स' गठीत करण्यात आलेला आहे. बांबू वृक्ष लागवडीच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये अमुलाग्र बदल होणार असून पर्यावरणाचा होणारा हास कमी होण्यास मदत होणार आहे. फक्त पर्यावरण संवर्धनासाठी नव्हे तर बांबूचा उपयोग इतर अनेक कामांसाठी केला जातो, जसे की इमारती, फर्निचर आणि कागद निर्मितीसाठी आणि प्रामुख्याने इंधन निर्मितीसाठी शेतकऱ्यांना एक शाश्र्वत पीक म्हणूनही बांबू लागवडीचा पर्याय नक्कीच उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे बांबू लागवड ही काळाची गरज आहे.

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार वनपट्टे तसेच खाजगी जमिनीवर बांबू लागवड करीता पालघर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये बांबू लागवड मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. मा. पाशा पटेल, अध्यक्ष, राज्य कृषी मूल्य आयोग (मंत्री दर्जा), हे 'मा. मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्र्वत विकास टास्क फोर्स' अंतर्गत स्थापित कार्यकारी समितीच्या अध्यक्ष तसेच मा. विवेक भाऊ पंडित, अध्यक्ष, राज्यस्तरीय आदिवासी विकास आढावा समिती (मंत्री दर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली मेळावे आयोजित केलेले आहे. त्यानुसार दि. १६ मे, २०२५ ते १९ मे, २०२५ या कालावधीत खालील 'बांबू मिशन शेतकरी मेळावे' आयोजित करण्यात येत आहेत, सदर मेळाव्यात पालघर जिल्ह्यातील बांबू लागवडीशी संबंधित सर्व यंत्रणा सदर मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रम श्रीमती. विजया जाधव उपजिल्हाधिकारी (रोहयो) पालघर यांच्या समन्वयाने पार पडणार आहे.

तरी पालघर जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी यांनी सदर मेळाव्यास उपस्थित राहण्याबाबतचे आवाहन मा. जिल्हाधिकारी पालघर डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी केले आहे.

## पानगाव येथे ३ हजार मेट्रिक टन क्षमतेच्या नव्या गोदामाची उभारणी होणार - आ कराड

लातूर – लातूर जिल्ह्यात सोयाबीन आणि इतर शेतमालाच्या सुरक्षित साठवणुकीसाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत ‘सोयाबीन साठवणूक क्लस्टर’ विकसित करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून याअंतर्गत रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे ३ हजार मेट्रिक टन क्षमतेचे नवीन वखार केंद्र, आधुनिक गोदाम उभारण्यात येणार असल्याची माहिती लातूर ग्रामीणचे आ. श्री रमेशआप्पा कराड यांनी दिली.



लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीनचे उत्पादन घेतले जाते गेल्या हंगामात नाफेडच्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत सोयाबीनची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आली. दरम्यान पारंपरिक गोदामांच्या मर्यादित क्षमतेमुळे आधुनिक साठवण सुविधांची गरज लक्षात घेऊन वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कौस्तुभ दिवेगावकर यांनी शेतकरी हितासाठी सायलो आणि आधुनिक गोदामांच्या उभारणीचा प्रकल्प हाती घेतला आहे.

या प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांना उत्तम दर मिळेपर्यंत माल साठवण्याची सुरक्षित व्यवस्था, गुणवत्ता संरक्षण, वखार पावती, आधारित कर्ज सुविधा आणि डिजिटल साठवण प्रणालीचा लाभ मिळेल असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाली की, लातूर एमआयडीसीतील सायलो प्रकल्प हा मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कृती आराखड्यात प्राधान्याने समाविष्ट आहे. सायलो बांधकामाची निविदा अंतिम टप्प्यात असून, राज्य शासनाच्या स्मार्ट योजनेंतर्गत निधी उपलब्ध होणार आहे.

पानगाव येथील वखार केंद्रासाठी बाजार समितीची जागा उपलब्ध झाली असून, निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. येत्या काही महिन्यांत हे प्रकल्प पूर्ण होऊन रेणापूर पानगाव भागातील शेतकऱ्यांसाठी अन्नधान्य साठवण हब म्हणून उदयास येईल, असा विश्र्वास व्यक्त करून सदरील प्रकल्पास मान्यता दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, पणन मंत्री जयकुमार रावल, जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि वखार महामंडळाचे अध्यक्ष कौस्तुभ दिवेगावकर यांचे जाहीर आभार लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांनी मानले आहेत.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

**कुटुंब --**
एकत्र आणा पुन्हा
दुभंगलेले जे कुटूंब
परिवार हो एकसंघ
इच्छा भरली तुडुंब
सुटलाचं नाही पीळ
जळालाजरीही सुंभ
पर्वानसे परिवाराची
होई सत्तेविनाकुचुंब
पेरुन ठेवी आपणचं
खुर्ची खालती सुरुंग
सत्तेस्तव नात्यांमध्ये
स्वताचं बांधी तुरूंग
एक हाती अधिकार
लालसा आहे तुरूंब
विजय व्हावा माझा
सर्व मार्गांचे अवलंब
पराजय पदरीपडता
मनात उठे आगडोंब
आताअस्वस्थ होता
शोधत फिरेआगबंब
पुन्हासिंहासनासाठी
प्रयासकरी अविलंब
युक्ती क्लृप्ती पाहता
सकळा वाटेलं अचंब
व्यूहरचना करा पुन्हा
नव्याने करावा प्रारंभ
जोडा जोडा परिवारा
भावना विवश आरंभ
...........

**स्तनपान --**
बांधकामावर कधी
माता करे स्तनपान
अलौकिक स्नेहाळ
दृश्य ते आरस्पान
अनाहूत नकळतचं
आदराने झुके मान
यशोधा न् नंदबाळा
सस्नेह करे सन्मान
भरून आलेला ऊर
अन्यत्र वळते ध्यान
दिशा बदली पाऊले
ठेवी अपूर्व अवधान
वासना लवलेश नसे
मोठे असो वा लहान
आईचाआठव उसळे
लागे स्नेहाळ तहान
अशाच देखाव्या का
अद्भुत मिळे वरदान
झुकतात सर्वनादान
जननी पुढे ते निदान
आईच्या विविध रुपा
जगताहवा अभिमान
बदलेलं वासना चित्र
लज्ज़ेचा होई सन्मान

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# माणगांव शहरातील नागरी समस्यांचे मान्सूनपूर्व निराकरण करा - मंत्री आदिती तटकरे

मुंबई : माणगांव शहरातील बारमाही वाहणारी काळनदी ही माणगांव शहराची जीवनवाहिनी आहे. या काळनदीचे पुनर्जीवन, जीर्णोद्धार आणि संवर्धन करण्याच्या प्रक्रियेस गती देण्यासाठी पर्यावरण विभागाची मंजुरी घेण्यात यावी. या परिसरात सुशोभीकरण व पर्यटनाच्या दृष्टीने सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या.



माणगांव नगरपंचायत हद्दीत काळनदी परिसर पुनर्जीवन जिर्णोद्धार आणि सुशोभीकरण करण्यासंदर्भातील कामकाजाचा आढावा नुकताच मंत्रालयात आयोजित बैठकीत घेण्यात आला. यावेळी जलजीवन, खरीप हंगाम यासंदर्भातील कामांचा आढावा मंत्री आदिती तटकरे यांनी घेतला.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, माणगांव नगरपंचायत क्षेत्रातील रस्ते दुरूस्तीचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावे. दलित वस्तीत लागू योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. नगरपंचायत, जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या अंगणवाडीचे बांधकाम, डागडुजीची कामे तात्काळ करण्यात यावी. या परिसरातील वनहक्क परिसरातील आदिवासींच्या मुलभूत गरजांसाठी स्वच्छतागृह, रस्ते, पाणी पुरवठा, पथदिवे, विद्युत वाहिनी, दूरसंचार शाखा, शाळा बांधण्यासाठी परवानगी असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यामुळे नागरिकांच्या मुलभूत गरजांसाठीचे बांधकाम करण्याच्या कार्यवाहीस गती देण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

जलजीवन आराखड्यासंदर्भात श्रीवर्धन येथे पूर्ण झालेल्या ३४ कामांचा अहवाल तातडीने सादर करावा, जिथे जलस्त्रोत नाही तिथे ही कामे यशस्वी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. याक्षेत्रात जलजीवनच्या पुढच्या टप्प्यात पाणी संवर्धनासाठी बंधाऱ्याची कामे प्रस्तावित करण्याच्या सूचना यावेळी मंत्री तटकरे यांनी यावेळी दिल्या.

खरीप हंगामातील माणगांव, रोहा, तळा, पाली येथील पिकांबाबत आढावा बैठक यावेळी घेण्यात आली. यावेळी जुन्या आंबा बागेमध्ये काळीमिरी आंतरपीक लागवड वाढवावी . तसेच महिलांचे क्लस्टर गट तयार करून कृषी पूरक उद्योग करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री तटकरे यांनी यावेळी दिले.

यावेळी माणगाव नगरपंचायत संदर्भात उपनगराध्यक्ष हर्षदा काळे, नगरसेवक आनंद यादव, नितीन वाढवळ, रत्नाकर उभारे, लक्ष्मी जाधव, सागर मुंडे, सुमित काळे, मनोज पवार यांच्याबरोबर विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.

जलजीवन योजनेसंदर्भात कार्यकारी अभियंता संजय वेणर्तेकर, उपअभियंता प्रशांत म्हात्रे, एकनाथ कोठेकर तर खरीप हंगामातील पिकांसंदर्भात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे, उपविभागीय कृषी अधिकारी वैभव खडकाळे, शुभम बोऱ्हाडे, कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# गरजूंना हक्काचे घर मिळावे यासाठी केंद्र शासनाने ३१ मे पर्यंत घरकुल सर्वेक्षणाची मुदत वाढविली भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी मोदी सरकारचे मानले आभार

लातूर – गोरगरीब, सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी काम करणारे देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने नागरिकांना हक्काचे घर मिळावे यासाठी पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुल आवास सर्वेक्षणास ३१ मे २०२५ पर्यंत मुदत वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे तेव्हा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गोरगरीब गरजू कुटुंबांनी ज्याचे अद्याप सर्वेक्षण झाले नाही, अशांनी संबंधिताशी संपर्क साधून त्वरित सर्वेक्षण पूर्ण करून घ्यावे असे आव्हान लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

देशभरातील एकही कुटुंब आपल्या हक्काच्या घरापासून वंचित राहता कामा नये यासाठी केंद्र शासनाने घरकुल आवास प्लस सर्वेक्षण मोहीम सुरू केली होती या मोहिमेची गुरुवार १५ मे रोजी पर्यंत मुदत होती मात्र अनेकांच्या घरचे सर्वेक्षण झाले नसल्याने आणि एकही गरजू कुटुंब वंचित राहू नये यासाठी महाराष्ट्रासह देशभरातील आठ राज्यात सदरील सर्वेक्षण मोहीमेस दोन आठवड्याची म्हणजे येत्या ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास आणि पंचायत राज मंत्रालयाच्या वतीने घेतला आहे. घरकुल योजनेच्या सर्वेक्षणास मुदत वाढ दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी मा. पंतप्रधान आणि केंद्रीय ग्रामविकास मंत्री यांचे आभार व्यक्त केले आहेत.

पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुल सर्वेक्षणास मुदतवाढ मिळाल्याने एकही गरजू व गरीब नागरिक घरकुल योजनेपासून वंचित राहणार नाही यासाठी संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांनी संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी अशा सूचना देऊन लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत असलेल्या गोरगरीब गरजू कुटुंबांनी ज्याचे अद्याप सर्वेक्षण झाले नाही, अशांनी संबंधिताशी संपर्क साधून त्वरित सर्वेक्षण पूर्ण करून घ्यावे. घरकुलाच्या नोंदणीसाठी पुढे यावे, असेही आवाहन लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे.

## आदिवासी विभागाच्या योजनांमध्ये महिलांना प्राधान्य द्या – मंत्री डॉ. अशोक वुईके

मुंबई, : आदिवासी विभागाच्या विविध योजनांचा



अधिकाधिक लाभ महिलांना आणि शालेय विद्यार्थ्यांना व्हावा, यासाठी या घटकांवर विशेष लक्ष केंद्रित करावे, असे निर्देश आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत आदिवासी विभागाकडील योजनांचा आढावा घेतला. या बैठकीस आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागाच्या आयुक्त लीना बनसोड तसेच इतर संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री डॉ. वुईके म्हणाले, आदिवासी महिलांचे सक्षमीकरण होणे गरजेचे असून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वतंत्र महिला बचत गट तयार करण्यात यावेत. ज्या गटांमध्ये आदिवासी महिलांचा सहभाग अधिक आहे, अशा गटांना योजनांचा प्राधान्याने लाभ द्यावा. सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षासाठी आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांना मंजुरी देण्यात आली असून या योजनांचा लाभ अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचावा यासाठी शबरी आदिवासी महामंडळात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

येत्या १६ जूनपासून शैक्षणिक वर्ष सुरू होत असून पहिल्या दिवशी शासकीय आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित रहावे. त्यासाठी आश्रमशाळानिहाय अधिकाऱ्यांची यादी तयार करण्यात यावी. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी यासाठी पालक अधिकारी नियुक्त करावेत, तसेच १०० टक्के निकाल देणाऱ्या शाळांना व गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यासाठी विशेष योजना राबवण्यात यावी, असेही मंत्री डॉ. वुईके यांनी यावेळी सांगितले.

मंत्री डॉ. वुईके म्हणाले, शैक्षणिक सत्र सुरू झाल्यानंतर आश्रमशाळेतील सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून हेल्थ कार्ड तयार करण्यात यावे. तसेच वसतिगृह समित्यांची स्थापना करून व्यवस्थापन अधिक प्रभावी करावे. शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या बदल्या करताना पूर्णपणे पारदर्शकता पाळावी, अशा सूचना मंत्री डॉ. वुईके यांनी यावेळी दिल्या.

## केळीच्या कल्स्टर डेव्हलपमेंटसाठी शासनाचे सर्वतोपरी सहकार्य – मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

मुंबई : केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी डिजिटल शेती शाळा असे नाविन्यपूर्ण उपक्रम प्रभावीपणे राबवा. केळी संशोधनाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा. जळगाव जिल्ह्यात केळी पिकाच्या कल्स्टर डेव्हलपमेंट कार्यक्रमासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल. केळी उत्पादक जमिनींची सुपिकता कायम रहावी, यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, असे कृषी मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.



जळगाव जिल्ह्यात केळी संशोधन, तंत्रज्ञान प्रसार केंद्र व केळी विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत मंत्रालय येथे बैठक घेण्यात आली. यावेळी कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे बोलत होते. यावेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, आमदार अमोल जावळे, फलोत्पादन संचालक डॉ. के. पी. मोते, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, उद्यानवेत्ता केळी संशोधन केंद्राचे डॉ. अरुण भोसले उपस्थित होते.

कृषी मंत्री ड. कोकाटे म्हणाले की, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि कृषी आयुक्तालयाने केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या विकासासाठी आवश्यक अशा सर्व उपाययोजना करण्यासाठी नियोजन करावे. केळी पिकांवर येणाऱ्या रोगाबाबत शेतकऱ्यांनी कोणती खबरदारी घ्यावी, कोणती औषधे वापरावीत याची माहिती शेतकऱ्यांना पोहोचवावी. तसेच शेतकऱ्यांसाठी नाविन्यपूर्ण संशोधन व त्याची माहिती प्रभावीपणे पोहाचवून केळी उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावेत. केळीची रोपे लावणे ते निर्यातीपर्यंत शेतकऱ्यांना माहिती पोहोचवावी. केळीच्या कल्स्टर डेव्हलपमेंट कार्यक्रमाला अधिक बळकट करण्यासाठी केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन उपाययोजना व निधीची तरतूद वाढवावी, असे मंत्री ड. कोकाटे यांनी यावेळी सांगितले.

आमदार अमोल जावळे यांनी केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि उपाययोजना विषयक चर्चा केली.

## भारतीय वायूदलाने हल्ला केल्यावर डोनाल्ड ट्रम्प यांची घाईघाईत मध्यस्थी: न्यूयॉर्क टाईम्स

नवी दिल्ली : भारत आणि पाकिस्तान युद्धजन्य स्थितीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घाईघाईत न विचारता केलेल्या मध्यस्थीवर 'न्यूयॉर्क टाईम्स'दैनिकाने टीका केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांना शांततेच्या नोबेलची घाई झाल्याचं दिसतंय असं न्यूयॉर्क टाईम्सने म्हटले आहे. ट्रम्प यांनी युद्धविरामाची घोषणा केल्यावर भारत कमालीचा नाराज झाला असेही न्यूयॉर्क टाईम्सच्या लेखात म्हटले आहे. खरंतर आधी अमेरिका या प्रश्नात पडण्यास इच्छूक नव्हता. मात्र, भारताने पाकिस्तानच्या आण्विक अस्त्र भांडारावर मारा केल्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी यात लक्ष घातलं आणि युद्धविरामाची घाई केली, असे या लेखात म्हटलंय. भारत हा राजनैतिकदृष्ट्या अमेरिकेच्या जवळ आला आहे. भारत अनेक शस्त्रास्त्र अमेरिकेकडून खरेदी करतो. तरी जेव्हा पाकिस्तनचा प्रश्न येतो तेव्हा मात्र चीन आणि अमेरिका एकाच पेजवर येतात, असे 'न्यूयॉर्क टाईम्स'च्या लेखात म्हटले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शस्त्रसंधीनंतर सातत्याने भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या अणवस्त्रांचा साठा असलेल्या किराना हिल्सवर हल्ला केल्याची चर्चा होती. भारतीय हवाई दलाने पाकिस्तानच्या रावळपिंडी येथील एअर बेसवर हल्ला केला होता. त्यावेळी पाकिस्तान घाबरला होता. कारण, तिथून जवळच काही अंतरावर किराना हिल्स येथे पाकिस्तानच्या अणवस्त्रांचा साठा आहे, असे सांगितले जात होते. भारताने याठिकाणी हल्ला केल्यामुळेच पाकिस्तान शस्त्रसंधीसाठी इतक्या लवकर राजी झाला, अशीही चर्चा होती.

## ❋जिल्हा माहिती कार्यालयाच्या वाहनासाठी टायर खरेदीकरिता दरपत्रके सादर करणेबाबत❋

लातूर, दि. १५ : जिल्हा माहिती कार्यालयाच्या टाटा सुमो गोल्ड या चारचाकी वाहनासाठी ४ टायर खरेदी करावयाचे आहे. यासाठी २१५/७५ ठ१५ आकाराचे ट्यूबलेस टायर्स खरेदी आणि टायर्सचे फिटींग, अलायमेंट व बॅलेन्सिंग करावयाचे आहे. यासाठी नोंदणीकृत टायर विक्रेत्यांनी आपली दरपत्रके दिनांक २६ मे, २०२५ पर्यंत जिल्हा माहिती कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

टायर खरेदीच्या अटी व शर्ती कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. तरी इच्छुक टायर विक्रेत्यांनी आपली दरपत्रके बंद लिफाफ्यात जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, उत्तर बाजू, लातूर या पत्त्यावर दिनांक १६ मे ते २६ मे, २०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सादर करावीत, असे कळविण्यात आले आहे.

## घरकुल नोंदणीसाठी ३१ मे पर्यंत मुदत वाढ, मागणीची दखल घेवून मुदतवाढ दिल्या बद्दल माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्याकडून शासनाचे आभार

लातूर : ग्रामीण भागातील गोर–गरीब लोकांना त्यांच्या हक्काचा निवारा मिळावा यासाठी शासनाकडून घरकुल आवास प्लस सर्वेक्षण मोहीम हाती घेण्यात आली होती. यासाठी १५ मे ही तारीख अंतिम होती.



अनेक गावांमध्ये विविध कारणांमुळे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले नव्हते त्यामुळे अनेक गरजू कुटुंब याच्या लाभापासून वंचित राहणार होते. ही बाब लक्षात घेऊन लातूर ग्रामीणचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राहूल कुमार मीना यांच्याशी संपर्क साधून योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात चर्चा केली तसेच या सर्वेक्षणासाठी मुदतवाढ मिळावी यासंबंधी पत्राद्वारे शासनाकडे विनंती केली केली होती.

त्यानुसार या सर्वेक्षणासाठी ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याचे परिपत्रक राज्यसरकारने जारी केले आहे. मागणीची दखल घेतल्याबद्दल शासनाचे आभार व्यक्त करून सर्वेक्षणासाठी मुदतवाढ मिळाली असल्याने संबंधित व्यक्तीनी घरकुलाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे यावे असे आवाहन माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केले आहे.

## पाकिस्तानची वेगाने प्रगती सुरु, पण भारत आम्हाला रोखण्याचा प्रयत्न करतोय; शाहीद आफ्रिदीचे हास्यास्पद वक्तव्य

नवी दिल्ली : भारताने फक्त दोन दिवसांत पाकिस्तानी सैन्याची दाणादाण उडवल्यानंतरही पाकचा तोरा अजूनही कमी झालेला नाही. पाकिस्तानमधील नेते आणि काही व्यक्ती सातत्याने भारताविरोधी गरळ ओकताना आणि फुशारक्या मारताना दिसत आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यात १० मे रोजी शस्त्रसंधी झाली होती. यानंतर पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू शाहीद आफ्रिदी सातत्याने भारताविरोधात वक्तव्ये करताना दिसत आहे. शाहीद आफ्रिदीने पाकिस्तानमध्ये विजयी यात्रा काढली होती. यावेळी शाहीद आफ्रिदीने आणखी एक हास्यास्पद वक्तव्य केले आहे. भारत हा पाकिस्तानला प्रगती करण्यापासून रोखत असल्याचे त्याने म्हटले.

भारत प्रगती करत आहे. आम्ही भारताच्या प्रगतीवर खुश आहोत. भारताचं क्रिकेटही प्रगती करत आहे, ही चांगली गोष्ट आहे. पाकिस्तानही पुढे जात आहे. पण आम्हाला रोखले जात आहे. कारण पाकिस्तान वेगाने प्रगती करत आहे. हे शेजाऱ्यांचे काम आहे का, असा सवाल शाहीद आफ्रिदीने विचारला. शाहिद आफ्रिदी याचा चुलत भाऊ शाकिब हरकत उल अंसार हा २००३ साली भारतीय सैन्यासोबत (घ्ह्ग्रह अीस्ब) अनंतनागमध्ये झालेल्या चकमकीत ठार झाला होता. तो दहशतवादी संघटनेचा कम ांडर होता. बीएसएफला शाकिबकडे सापडलेल्या कागदपत्रांवरुन ही गोष्ट सिद्ध झाली होती. मात्र, शाहीद आफ्रिदीने या वृत्ताचा इन्कार केला होता. भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युद्धाच्या खुमखुमीने भारताला संकटात ढकलले आहे.

पाकिस्तानचा सामना करणे किती महागात पडते हे पंतप्रधान मोदींना आता कळाले असेल, असे आफ्रिदीने म्हटले होते. शाहीद आफ्रिदीने सोमवारी कराची येथे विजयी रॅली काढली होती. शाहिद आफ्रिदी यापूर्वी भारत सरकार आणि सशस्त्र दलांविरुद्ध केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे चर्चेत राहिला आहे, विशेषत: पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या वेळी त्याने भारतीय सैन्यावर वादग्रस्त विधान केले होते.

# छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवनचरित्र प्रेरणादायी – केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव

नवी दिल्ली, : छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवनचरित्र प्रेरणादायी असून कितीही संकटे आली तरी हार मानायची नाही असा बोध त्यांच्या चरित्रातून मिळतो, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६८ व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात केले.



महाराष्ट्र सदन येथे सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन, छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय जयंती व सांस्कृतिक महोत्सव दिल्ली यांच्या वतीने बुधवारी सायंकाळी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शिवाजी जाधवराव, आचार्य श्रीजामोदेकर बाबा, सुदर्शन न्यूज चॅनेलचे संचालक डॉ. सुरेश चव्हाण, सुप्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगांवकर, गायक व संगीतकार डॉ. राजेश सरकटे, शिव व्याख्याते प्रा. रविंद्र बनसोड यांच्यासह संघटेनेचे मान्यवर मंचावर उपस्थित होते.

केंद्रीय आयुष राज्यमंत्री जाधव म्हणाले की, छत्रपती शंभूराजांनी छत्रपती शिवरायांचा वारसा समर्थपणे चालविला. शंभूराजे यांचे व्यक्तीमत्व अष्टपैलू होते. त्यांना साहित्यातही रस होता, ते भाषाप्रेमी होते. छत्रपती शंभूराजांच्या विचारांचा अंगिकार हिच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे केंद्रीय राज्यमंत्री जाधव म्हणाले.

महाराष्ट्र सदनात सायंकाळी मान्यवरांच्या हस्ते हितेश पटोळे यांनी तयार केलेल्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या अश्र्वारूढ पुतळ्याचे पूजन व अभिवादन करण्यात आले. तसेच महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमातही छत्रपती शंभूराजेंच्या पुतळ्याचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी सामाजिक क्षेत्रात विशेष काम करणाऱ्या मान्यवरांचा स्मृती चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

प्रा. राजेश सरकटे यांच्या 'गर्जा महाराष्ट्र' हा सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. प्रा. डॉ. प्रभाकर जाधव यांच्या 'मराठा टुरिझम' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. व्याख्याते प्रा. रवींद्र बनसोड यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर ओजस्वी व्याख्यान दिले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन जयंती महोत्सव अध्यक्ष व छावा भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. विलास पांगारकर, छावाचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण, भारत क्रांती मिशनचे मुख्य समन्वयक विजय काकडे पाटील, सरचिटणीस परमेश्र्वर नलावडे, स्वागत अध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर, प्रा. राजेश सरकटे, विनोद सरकटे, अक्षय ताठे, सतीष जगताप आणि अमोल टकले यांनी केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे हा ऐतिहासिक सोहळा यशस्वी झाला.

## फणस लागवड क्षेत्र वाढीसाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करा - मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

मुंबई, : फणस उत्पादन लागवडीखालील क्षेत्र वाढावे, यासाठी दापोली कृषी विद्यापीठाने सर्वसमावेशक असा आराखडा तयार करावा. फणसाच्या विविध जातीची दर्जेदार कलमे तयार करणे, रोपवाटिका उभारणे तसेच फणस फळपिकाविषयी संशोधन करण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी बैठकीत निर्देश दिले.

फणस फळपीक संशोधन विकास केंद्र स्थापन करण्याबाबत मंत्रालय येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीत कृषी मंत्री ॲड. कोकाटे बोलत होते. यावेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, फलोत्पादन संचालक डॉ. के. पी. मोते, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे डॉ. पराग हळदणकर, जॅकफ्रुट ग्रो प्रोड्युसर कंपनी झापडे ता. लांजा येथील मिथिलेश देसाई उपस्थित होते.

कृषी मंत्री ॲड. कोकाटे म्हणाले की, फणस हे नगदी फळपीक म्हणून शेतकऱ्यांना फायदेशीर ठरू शकते. त्यामुळे फणसाच्या राज्यातील व देशातील जाती पाहून राज्यात कोणत्या जाती फायदेशीर ठरू शकतात याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. फणस लागवडी योग्य क्षेत्र कोणते आहे याची पाहणी करून त्याचे क्षेत्र वाढविणे गरजेचे आहे. या फळपिकाला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे हे लक्षात घेऊन त्याप्रमाणे नियोजन करावे. फ्रुट ग्रो प्रोड्युसर कंपन्या कोणकोणती उत्पादने घेतात त्या अनुषंगाने शासन काय करू शकते याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. तसेच विद्यापीठाने त्यांच्याकडे फणस फळपीकाबाबत अभ्यास तसेच अनुषंगिक बाबींकरिता शासनाकडे सुधारित प्रस्ताव सादर करावा. याबाबत राज्य शासन नक्कीच तरतूद वाढवून या फळपिकाच्या विकासासाठी ठोस निर्णय घेईल, असे त्यांनी सांगितले.

## लातूरात सोमवारपासून दोन दिवसीय जिल्हास्तरीय आंबा महोत्सव

लातूर, : जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी १९ आणि २० मे २०२५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क मैदानावर जिल्हास्तरीय आंबा महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या या महोत्सवात केशर, बादाम, हापूस, अल्फान्सो, पायरी, लंगडा, तोतापुरी आदी दर्जेदार आंब्यांची विक्री होईल.

जिल्ह्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजना आणि भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत गेल्या पाच वर्षांत आंबा लागवडीचे क्षेत्र वाढले आहे. जिल्हास्तरीय आंबा महोत्सवात आंबा विक्रीसाठी स्टॉल नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आर. टी. जाधव यांनी केले आहे. तसेच, लातूर जिल्ह्यातील नागरिकांनी या महोत्सवात सहभागी व्हावे, असेही त्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## तोंडारपाटी येथील शासकीय निवासी शाळेत प्रवेश प्रक्रिया सुरु

लातूर, : उदगीर तालुक्यातील तोंडारपाटी येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांच्या शासकीय निवासी शाळेत इयत्ता ६ वी ते १०वीच्या सेमी–इंग्रजी माध्यमाच्या रिक्त जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत २०13 पासून कार्यरत असलेल्या या शाळेत अनुसूचित जाती (८० टक्के), अनुसूचित जमाती (१० टक्के), विमुक्त जाती (५ टक्के), दिव्यांग (३ टक्के) आणि विशेष मागास प्रवर्ग (२ टक्के) आदी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी जागा आरक्षित आहेत.

या शाळेला आयएसओ मानांकन प्राप्त असून, ती लातूरमधील सामाजिक न्याय विभागाची दहावी मानांकित शाळा आहे. येथे इलीमेंटरी व इंटरमीडिएट परीक्षांची तयारी, २ हजारपेक्षा अधिक संदर्भ पुस्तकांचे ग्रंथालय, ई–लायब्ररी, वृत्तपत्रे, अत्याधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल वर्गखोल्या, संगणक प्रयोगशाळा, आर. ओ. पाणी, २४ तास वीज व सुरक्षा, सुसज्ज जिम यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना नाश्ता, दूध, अंडी, फळे, दोनवेळचे जेवण, गणवेश, शैक्षणिक साहित्य, कॉट, गादी, उशी, साबण, तेल, पेस्ट आदी पुरवले जातात. तरी इच्छुकांनी ३० जून २०२५ पर्यंत नावनोंदणी करावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त एस. एन. चिकुर्ते आणि शाळेच्या मुख्याध्यापकांनी केले आहे.

## शेतकऱ्यांनी डीएपीऐवजी पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन

लातूर, : जिल्ह्यात खरिप हंगामाच्या पेरणीला लवकरच सुरुवात होणार असून, शेतकऱ्यांकडून डीएपी खताची मागणी वाढली आहे. मात्र, केवळ डीएपी खतांवर अवलंबून न राहता पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आर. टी. जाधव यांनी केले आहे.

डीएपीमध्ये १८ टक्के नत्र आणि ४६ टक्के स्फुरद असते. याला पर्याय म्हणून एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) खताचा वापर सुचवण्यात आला आहे. एसएसपीमध्ये १६ टक्के स्फुरद, सल्फर आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये असून, विशेषतः तेलबिया पिकांसाठी ते फायदेशीर आहे. डीएपीच्या एका गोणीऐवजी युरियाची अर्धी गोणी आणि एसएसपीच्या तीन गोण्या वापरता येतील. तसेच, एनपीके–१०:२६:२६, एनपीके–२०:२०:0:१3, एनपीके–१२:३२:१६, एनपीके–१५:१५:१५ यांसारख्या संयुक्त खतांमुळे नत्र, स्फुरद आणि पालाश उपलब्ध होऊन पिकांचे पोषण होते.

याशिवाय, टिएसपी (ट्रिपल सुपर फॉस्फेट) खतात ४६ टक्के स्फुरद असून, डीएपीच्या एका गोणीऐवजी युरियाची अर्धी गोणी आणि टिएसपीची एक गोणी वापरता येते. शेतकऱ्यांनी बाजारात उपलब्ध पर्यायी खतांचा वापर करून डीएपीवरील अवलंबित्व कमी करावे, असे श्री. जाधव यांनी सांगितले.

## (गुरु वचन) कुशल मार्गदर्शन

एका प्रयोगशाळेत काही विद्यार्थी प्रयोग करत होते. यावेळी दोन विद्यार्थ्यांकडून मोठी चूक झाली. त्यांना वाटले की, आता त्यांना कठोर शिक्षा मिळेल. प्रयोगशाळा त्यावेळी प्रसिद्ध वैज्ञानिकाने काही दिवसांपूर्वीच सुरु केली होती. दोन्ही विद्यार्थी घाबरत–घाबरत त्यांच्याजवळ गेले. वैज्ञानिकाने त्यांना घाबरलेले पाहून विचारले, काय झाले? यावर एक विद्यार्थी घाबरत–घाबरत म्हणाला, सर इलेक्ट्रिक मिटर खराब झाले आहे. यामुळे त्याच्यात खूप जास्त करंट पसरला आहे. हे ऐकून वैज्ञानिक सुन्न झाला. नंतर त्याने स्वत:ला सावरले आणि म्हणाला, अरे फक्त एवढ्या छोट्या गोष्टीसाठी तुम्ही दोघे एवढे परेशान आहात. विद्यार्थी जेव्हा प्रयोग करतात तेव्हा अशा गोष्टी घडतच असतात. जर विद्यार्थ्यांनी चूका केल्या नाहीत तर ते शिकतील कसे? परंतु भविष्यात प्रयोग करताना मात्र अवश्य सावधानी बाळगायला हवी. ज्यामुळे अशा प्रसंगापासून वाचता येईल. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकाचे म्हणणे ऐकूल्यानंतर वैज्ञानिकाप्रती त्यांच्या मनात आदर निर्माण झाला. तथापि, जी चूक या दोन्ही विद्यार्थ्यांकडून झाली होती. त्यामुळे एका खूप महागडे आणि महत्त्वाचे यंत्र पूर्णपणे जळाले होते आणि ते यंत्र सध्या बाजारात उपलब्ध नव्हते. एवढेच नव्हे तर ते यंत्र जळाल्यामुळे अनेक महत्त्वपूर्ण प्रयोगही थांबले होते. परंतु वैज्ञानिक या नुकसानावर न चिडले न त्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांवर राग व्यक्त केला. तर दोन्ही विद्यार्थ्यांना भयमुक्त केले. त्यानंतर ज्यांनीही हा प्रसंग ऐकला. त्यांनी वैज्ञानिकाची स्तुती केली.

## दहशतवाद्यांनी धर्म विचारुन मारलं, आम्ही कर्म पाहून त्यांना अद्दल घडविली–राजनाथ सिंह

श्रीनगर : दहशतवादासाठी तुमच्या जमिनीचा वापर नको, हाच पाकिस्तानला संदेश आहे. दहशतवाद्यांना पोसणाऱ्यांना आम्ही सोडणार नाही, अशा इशारा केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी दिला. ते श्रीनगरच्या दौऱ्यावर आल्यानंतर बोलत होते. केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह म्हणाले, हुतात्मा झालेल्या सैनिकांना नमन आहे. संपूर्ण देशाला सैनिकांचा गर्व आहे. हाच संदेश घेऊन येथं मी आलो आहे. आपल्या सैन्याचा निशाणा अचूक आहे, हे जगाला माहित आहे. ऑपरेशन सिंदूर ही सर्वात मोठी कारवाई आहे. वेळप्रसंगी आपण कठोर निर्णय घेतो. आपली सेना हल्ला करते, तेव्हा मृतदेह मोजण्याचं काम शत्रू करतो.

# खरीप हंगाम जागृती लेखमाला – घरच्या घरी पहा बियाण्याची उगवणक्षमता...!!

खरीप हंगाम जवळ आला की शेतकऱ्यांची पेरणीची लगबग सुरू होते. उत्पादनात भरघोस वाढ व्हावी, यासाठी बियाण्याची निवड हा पहिला आणि महत्त्वाचा टप्पा ठरतो. अनेकदा शेतकरी बांधव दरवर्षी बाजारातून नवे बियाणे खरेदी करतात. परंतु हे बियाणे महाग असतानाही त्याची उगवणक्षमता कितपत योग्य आहे, हे निश्चित नसते. अशा वेळी वेळ, श्रम आणि पैसा वाया जाण्याचा धोका असतो. त्यामुळेच ''उगवणक्षम बियाणं'' वापरणे हा खरीप यशस्वी करण्याचा मूलमंत्र ठरतो.

या लेखातून आपण बियाण्याची उगवणक्षमता का तपासावी, त्याचे फायदे काय आहेत, आणि घरच्या घरी ती कशी तपासायची याबाबतच्या सोप्या आणि वैज्ञानिक पद्धती जाणून घेणार आहोत. जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयाच्या सौजन्याने ही माहिती तुमच्या पर्यत पोहचवत आहोत...!!

दरवर्षी नवीन बियाणे खरेदी करणे गरजेचे आहे का?

अनेक शेतकरी बांधवांचा समज असतो की प्रत्येक वर्षी नवीन बियाणे बाजारातून विकत घेऊनच पेरणी करावी. मात्र, सोयाबीन, मुग, उडीद, गहू, चवळी, मुईमुग यांसारखी पिकं स्वपरागसिंचीत (शिश्रष–श्रिश्रळपरींशव) असल्यामुळे त्यामध्ये संकरीत वाणांचा प्रश्न नसतो. त्यामुळे एकदा प्रमाणित बियाणे विकत घेतल्यावर त्यापासून तयार झालेल्या पिकाचे बियाणे पुढील दोन वर्षे वापरता येते.

यामुळे दरवर्षी नवीन बियाण्यावर होणारा अनावश्यक खर्च टाळता येतो. पण हे बियाणे वापरण्यापूर्वी त्याची उगवणक्षमता (सशीाळपरींळेप लररिलळीूं) तपासणे अत्यावश्यक असते.

बाजारातील बियाण्यांवर अवलंबून राहणे का धोकादायक ठरते?

कधीकधी विकत घेतलेले बियाणे उगवत नाही. अशावेळी शेतकरी बांधवांनी खते, मेहनत, वेळ आणि पैसा खर्च केलेला असतो. पेरणी कालावधीही निघून जातो. नंतर लेखी तक्रार, पंचनामे, नुकसानभरपाईसाठी प्रयत्न यामुळे मानसिक व आर्थिक त्रास होतो.

यावर उपाय म्हणजे बियाण्याची उगवणक्षमता तपासूनच पेरणी करणे. ही तपासणी आपण घरी सहज करू शकतो.

उगवणक्षमता तपासणीच्या तीन सोप्या पद्धती

– गोणपाट वापरून तपासणी :

प्रत्येक पोत्यातून थोडे बियाणे घेऊन एकत्र करा.१०० दाण्यांचे ३ नमुने तयार करा.

ओल्या गोणपाटावर दाणे १०–१० च्या रांगेत लावा.वरून दुसरा ओला गोणपाट घाला आणि गुंडाळी करून सावलीत ठेवा.६–७ दिवसांनी उगवलेले दाणे मोजा.७०म किंवा त्यापेक्षा अधिक उगवणक्षमता असल्यास बियाणे योग्य.

– रद्दी पेपर वापरून तपासणी:

रद्दी पेपरला चार घड्या घालून ओले करा.

प्रत्येकी १० बियांच्या १० ओळी तयार करा (एकूण १०० बिया).गुंडाळ्या करून पिशवीत ठेवा.दिवसांनी अंकुर आलेल्या बिया मोजा.

७०म किंवा अधिक बिया उगवल्यास बियाणे योग्य समजावे.

– पाण्यात भिजवून त्वरीत तपासणी:

१०० दाण्यांचे ३ संच तयार करा.५–७ मिनिटे पाण्यात ठेवा.

टरफल सुरकुतलेलेफुगलेले दाणे वगळा.फुगलेले दाणे – खराब.

_रफल शाबूत व सुरकुत्या नसलेले दाणे – चांगले.७०म किंवा अधिक दाणे चांगले असल्यास बियाणे वापरण्यास योग्य.

– पेरणीपूर्वी बियाण्यावर प्रक्रिया करणे का आवश्यक?

बियाणे कितीही चांगले असले, तरी त्यावर योग्य ती प्रक्रिया करणे अत्यावश्यक असते.

बुरशीनाशक (इल्हुम्म्) व जिवाणू संवर्धक (इळेषशीींळश्रळशी) यांची प्रक्रिया केल्यास बियाण्याच्या उगवणीत वाढ होते व रोगप्रतिकारशक्तीही वाढते.

थोडक्यात सांगायचं झालं तर...

प्रत्येक वेळी बियाणे विकत घेण्याऐवजी उगवणक्षम बियाणे घरीच तयार करून वापरा.

– पेरणीपूर्वी घरीच उगवणक्षमता तपासा :

७०म हून अधिक उगवण असलेले बियाणे वापरण्यास हरकत नाही. उगवणक्षमता कमी असल्यास प्रमाण वाढवून पेरणी करा.

बुरशीनाशक आणि जिवाणू संवर्धक प्रक्रिया करू नका विसरू.

अधिक माहितीसाठी संपर्क साधा :

आपल्या गावातील कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषि अधिकारी हे यासाठी मार्गदर्शनासाठी उपलब्ध आहेत.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, जळगाव**

## उपदेशकथा, लोभाचा परीणाम

आकाशातील ढगांचा हेवा वाटून त्याच्या प्राप्तीसाठी एका चिमणीने उडाण भरले, ती वर वर जाऊ लागली. ढगाजवळ ती पोहचणार इतक्यात ढगाने आपली दिशा बदलली. चिमणी त्याच्याकडे जाऊ लागली. पुन्हा ती जवळ येताच ढग अंतर्धान पावला. त्याच्या शोधात चिमणी भटकू लागली. दूरवर तिला तो दिसला, त्याच्याजवळ ती गेली तर ढग पसरला त्याचे सुटे सुटे भाग झाले. कोणता भाग पकडवावा या विचारात ती चिमणी भटकू लागली. इतक्या वेळच्या उडण्याने तिचे शरीर थकले तरीही ती प्रयत्न सोडत नव्हती. ढगप्राप्तीचा तिचा लोभ सुटत नव्हता! ती त्याच्या अगदी जवळ गेली निकराचा प्रयत्न करून तिने त्याला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला तर ढगच विरून गेला आणि काहीही हाती न लागता, केवळ धावपळीनेच दमछाक झालेली ती चिमणी जमिनीवरती कोसळली.

कथा उपदेश : माणसाचेही असेच आहे. मृगजळरूपी सुखाम ागे धावण्यात त्याचे आयुष्य सरते. हाती काहीच लागत नाही. लोभाचा शेवट असाच.

## त्यांच्या वाणीतून....

आमच्या बहिणींचं कुंकू पुसण्याचं काम केलं त्यांना ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून धडा शिकवला. भारतीय सैन्यांनी पाकिस्तानात घूसून दहशतवाद्यांचे अड्डे उद्धवस्त केले. भारताने ज्या ९ ठिकाणी दहशतवाद्यांचे अड्डे उद्धवस्त केले, त्या ठिकाणी भारतीय सेना कधीच पोहचणार नाही असं पाकिस्तानला वाटायचे. मात्र, तेथेच जाऊन भारतीय सैन्यांनी दहशतवाद्यांचा खात्मा केला. तसेच पाकिस्तानला हे दाखवून दिले की दहशतवादी कुठेही लपले तरी आम्ही सोडणार नाही.

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

राज्यातील इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या रोजगार, सेवाशर्तीचे नियमन करणे, त्यांची सुरक्षा, आरोग्य व कल्याणासाठी राज्य शासन सातत्याने उपाययोजना राबवित आहे. त्याअनुषंगानेच जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी व्हावी व त्यांना योजनेचे सर्व लाभ मिळावेत ही बाब विचारात घेवून तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात यावी.

**- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

## शोपियाननंतर आता पुलवामाच्या त्रालमध्ये जैश-ए-मोहम्मदचे ३ दहशतवादी ठार

श्रीनगर : जम्मू–काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यात आज. गुरुवारी पहाटे झालेल्या चकमकीत जैश–ए–मोहम्मदचे ३ दहशतवादी ठार झालेत. त्राल भागातील नादिर गावात झालेल्या चकमकीत आसिफ अहमद शेख, अमीर नजीर वणी आणि यावर अहमद भट हे ३ दहशतवादी ठार झालेत. दहशतवाद्यांबाबत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आज, गुरुवारी पहाटे भारतीय सैन्य, जम्मू– काश्मीर पोलिस आणि सीआरपीएफ जवानांनी संयुक्तरित्या नादर, त्राल, अवंतीपोरा येथे घेराबंदी आणि शोधमोहीम सुरु केली. यादरम्यान सतर्क जवानांना काही संशयास्पद हालचाली दिसून आल्या. त्यांनतर दहशतवाद्यांनी जोरदार गोळीबार सुरू केला आणि त्याला सुरक्षा जवानांनी चोख प्रत्युतर दिले. यामध्ये जैश–ए–मोहम्मदचे ३ दहशतवादी ठार झाले असल्याची माहिती समोर आली आहे. जम्मू–काश्मीरमध्ये ४८ तासांतील ही दुसरी चकमक आहे. शोपियान जिल्ह्यातील केलर भागात सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईत लश्कर–ए–तोयबाच्या ३ दहशतवाद्यांना ठार करण्यात आले होते. त्यानंतर आज, गुरुवारी त्राल येथे ही चकमक घडली.

## विकासाचे ग्रोथ इंजिन म्हणून शहर विकासाला शासनाचे प्राधान्य – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे दि. १५ : विकासाचे ग्रोथ इंजिन म्हणून शहर विकासाला केंद्र आणि राज्यशासन प्राधान्य देत असून गेल्या १० वर्षात नागरीकरणासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली आहे. शहरी भागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी, त्यांना उत्तम सुविधा देण्यासाठी चांगल्या योजना राबविल्यास राज्य शासनातर्फे स्थानिक स्वराज्य संस्थांना सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

नगरविकास विभागातर्फे राज्यातील महानगरपालिका आयुक्त आणि नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकरिता यशदा येथे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, अतिरिक्त मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक नागरी लोकसंख्या असलेले दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. विकासाची प्रक्रिया नागरिकरणाभोवती फिरते. शिक्षण, आरोग्य, रोजगार, मनोरंजन या चार गोष्टींसाठी नागरिक शहराकडे आकर्षित होतात. असे असताना विकासासोबत वाढत्या शहरीकरणाचा योग्यरितीने विचार न केल्याने शहर विकासाचे योग्य धोरण करण्यात आले नाही आणि त्यामुळे शहरातील समस्या निर्माण झाल्या. राज्यात ६ कोटी लोक ४५० शहरात राहतात. ही शहरे सुंदर करता आली तर ५० टक्के जनतेचे जीवनमान उंचावता येईल.

शहरी भागातील प्राथमिक आरोग्य सुविधा निर्मितीकडे लक्ष द्यावे लागेल. यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करावी. महानगरपालिकेच्या शाळेत गरीबाच्या मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापनाचे प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होण्यासाठी त्याचा नियमित आढावा घेऊन त्यातील अडचणी दूर करणे गरजेचे आहे. पाणी पुरवठ्यासाठी योग्य वितरण प्रणाली उभी करणे आणि मीटर पद्धत सुरू करणे तेवढेच महत्वाचे आहे. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठीच्या अशा योजनांसाठी शासन सहकार्य करेल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

गेल्या काही वर्षात शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्यात आला. वस्तू आणि सेवा पुरविताना नवा दृष्टिकोन स्वीकारण्यासह नव्या कल्पना अंमलात आणाव्या लागतील. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी उभारण्याचे नवे स्रोत शोधावे लागतील, त्यासोबत करांच्या वसुलीकडेही लक्ष द्यावे. शहराच्या आर्थिक प्रगतीवर भर दिल्यास नागरिक कर भरण्यास पुढे येतील. चांगल्या प्रकल्पासाठी खाजगी क्षेत्रातूनही निधी सहज उपलब्ध होऊ शकेल. त्यादृष्टीने शहरच्या शाश्र्वत विकासाचे नियोजन करावे, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. शहर विकासाच्या आराखड्याद्वारे शहराचा सुनियोजित विकास करता येतो. सुनियोजित रस्ते तयार केल्यास शहर सुंदर करता येतील, असेही ते म्हणाले.

शंभर दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांनी चांगली कामगिरी केली. नव्याने केलेल्या सुधारणा संस्थात्मक पातळीवर राबवल्या गेल्यास प्रशासन निरंतर सुधारत राहील. आता १५० दिवसांचा कार्यक्रम आखला आहे. यामध्ये ई– गव्हर्नसचा उपयोग आणि मनुष्यबळ विकासावर भर द्यायचा आहे. यासाठी शासनाकडून सर्व सहकार्य करण्यात येईल. मनुष्यबळासंबंधी सुधारणा करून आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रशासन अधिक कार्यक्षम करता येईल.

राज्य आणि केंद्राकडून मिळणारा निधी वेळेवर खर्च करून विकासाला गती देणे गरजेचे आहे, त्यासाठी डिजिटल प्रणालीचा पूर्ण वापर करणे महत्वाचे आहे. तंत्रज्ञानाच्या उपयोगाद्वारे कामावर नियंत्रण ठेऊन गुणवत्ता सुनिश्र्चित करण्याची गरज आहे.

## राशिभविष्य १६ मे २०२५

मेष: शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम

भागीदारी व्यवसायत फायदा होईल. अडचणी दूर होतील. विचारपूर्वक व स्वनिर्णय घेऊन कामे करा. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

वृषभ : शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण

आज आपली कार्यक्षमता वाढणार आहे. वहान सुख मि ळेल. कुटुंबातील सदस्याची काळजी घ्या. व्यापारातील योजना फलदायी होतील. आर्थिक उत्पन्न वाढेल.

मिथुन शुभ रंग: पांढरा: शुभ दिशा: उत्तर

मुलांच्या संबधातील कामात प्रगती राहील. मान सन्मान यश मिळेल. प्रिय व्यक्तिची भेट होण्याची शक्यता आहे. आपल्या मनासारखे सर्वकाही होईल. आळसाला दूर राखा.

कर्क : शुभ रंग: काळा., शुभ दिशा: दक्षिण

कामकाजात अडचणी आल्यामुळे आपल्याला चिंता लागणार आहे. आर्थिक स्थिती मध्यम राहील. निष्कारण वाद विवाद करू नका. उत्साह राहणार नाही. नवीन संबंधाच्या बाबतीत जागरूकता दाखवा.

सिंह : शुभ रंग: भूरकट, शुभ दिशा:पश्चिम

नौकरीमधील कुशलतेमुळे फायदा मिळेल. शत्रुच्या कुटनितीपासून सावध रहा. आपल्या व्यसनांवर नियंत्रण राखावे लागणार आहे.

कन्या :शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: दक्षिण

विनम्र होऊन कार्य केले तर प्रत्येक कामात यश मिळेल. मनासारखा फायदा होईल. मुलांच्या कामामुळे समाजात प्रतिष्ठा वाढेल. वाद विवादापासून दूर रहा.

तुळ: शुभ रंग :काळा, शुभ दिशा: पश्चिम

योग्य परिश्रम घेतल्याने आपले काम सुरळीत पार पडणार आहे. कौटुंबिक अडचण दूर होईल. जीवनसाथीची साथ मिळेल. प्रवासात सावधानता बाळगा.

वृश्चिक: शुभ रंग: काळा, शुभ दिशा:उत्तर

कौटुंबिक वाद, मतभेद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येणार आहे. व्यावसायिक यशामुळे आनंदी रहाल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका. कामकाजाची परिस्थिती फायदेशीर राहील.

धनु: शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर

नौकरीत इच्छेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहेत. कुटुंबात आनंदी वातावरण राहील. नवीन लोकांचा संपर्क फायदेशीर असणार आहे. घाईने निर्णय घेऊ नका.

मकर :शुभ रंग: लाल : शुभ दिशा: पश्चिम

व्यापारात प्रगतीचे योग आहेत. कलेविषयातील रूची वाढेल. प्रभावशाली व्यक्तिंच्या भेटी होतील. आर्थिक फायदा मिळण्याचे योग आहेत. संयमाने कामे करा.

कुंभ: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण

जीवनासाथीशी संबंध सुधारतील. कायद्याचा निकाल आपल्या बाजूने लागेल. कामकाजाचे क्षेत्र वाढणार आहे. नौकरांवर विश्वास दाखवू नका.

मीन :शुभ रंग: काळा, शुभ दिशा: दक्षिण

नौकरीमध्ये आधिकारी नाराज राहतील. खूप प्रयत्न केले तरी कामात थोडेच यश मिळेल. कौटुंबिक चिंतेमुळे मन असम ाधानी राहील. आर्थिक स्थिती मध्यम राहील.

## इतिहासात आजचा दिवस १६ मे २०२५

अंतरराष्ट्रीय

१२०४ – बाल्डविन नववा पहिला लॅटिन स्राट झाला.

१५२७ – फ्लोरेन्सच्या जनतेने मेदिची घराण्याची राजवट उलथवली व प्रजासत्ताक राजवट लागू केली.

१५६८ – मेरी स्टुअर्ट पळून ईंग्लंडला आली.

१६०५ – पॉल पाचवा पोपपदी.

१७७० – १४ वर्षाच्या मेरी आंत्वानेत व १५ वर्षाच्या लुई ऑगुस्तेचेलग्न.

१८३६ – २७ वर्षाच्या एडगर ऍलन पोने त्याच्या १३ वर्षाच्या चुलत बहिणीशी लग्न केले.

१८६८ – अमेरिकन राष्ट्राध्यक्ष अँड्रु जॅक्सन महाभियोग खटल्यात १ मताने निर्दोष ठरला.

१८७४ – मॅसेच्युसेटसमध्ये पूर. १३९ ठार.

१९१८ – अमेरिकेत सरकारवर टीका करणे हा तुरुंगवासास पात्र गुन्हा ठरवण्यात आला.

१९२० – पोप बेनेडिक्ट पंधराव्याने जोन ऑफ आर्कला संत ठरवले.

१९२९ – पहिले ऑस्कार पुरस्कार वितरीत.

१९३८ – अटलांटा येथे एका हॉटेलमध्ये आग. ३५ ठार.

१९४८ – चैम वाइझमान इस्रायेलच्या पंतप्रधानपदी.

१९५२ – ब्रिटिश संसदेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने पगार मिळायला हवा, असा ठराव केला.

१९६६ – चीनी कम्युनिस्ट पक्षाने सांस्कृतिक क्रांतीला सुरुवात केली.

१९६९ – सोवियेत संघाचे अंतराळयान व्हेनेरा ५ शुक्रावर उतरले.

१९७५ – जुन्को ताबेई एव्हरेस्टवर चढणारी प्रथम स्त्री ठरली.

१९९२ – स्पेस शटल एन्डेव्हरची प्रथम अंतराळयात्रा सफल.

२००३ – कॅसा ब्लांकात अतिरेक्यांचा हल्ला. ३३ नागरिक ठार. १०० जखमी.

२००५ – कुवैतमध्ये स्त्रीयांना प्रथमच मतदानाचा हक्क.

२००६ – न्यूझीलंडजवळ रिश्टर मापनपद्धतीनुसार ७.४ तीव्रतेचा भूकंप.

राष्ट्रीय

१९७५ – सिक्कीममधील जनतेने कौल दिल्यावर भारताने सिक्कीमला देशाचा भाग करुन घेतले.

१९९६ – अटलबिहारी वाजपेयी भारताच्या पंतप्रधानपदी.

२००६ – लाभाचे पद संबंधातील विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले.

२००७ – रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने देशातील पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर नवीन गॅस साठे मिळाले असल्याची घोषणा केली.

जन्म

१६११ – पोप इनोसंट अकरावा याचा जन्म.

१९२६ – माणिक वर्मा, शास्त्रीय व सुगम संगीत गायिकाचा जन्म.

१९३१ – के. नटवर सिंग, भारतीय परराष्ट्र मंत्रीचा जन्म.

१९७० – गॅब्रियेला सॅबाटिनी, आर्जेन्टिनाची टेनिसपटूचा जन्म.

१९७५ – निरोशन बंदरतिलके, श्रीलंकेचा क्रिकेटपटूचा जन्म.

निधन

१९२६ – महमद सहावा, शेवटचा ऑट्टोमन स्राटचे निधन.

१९५० – कोल्हापूर संस्थानचे दिवाण; अर्थमंत्री, महाराष्ट्र अण्णासाहेब लठ्ठे यांचे निधन.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894